**नियमीत दिवाणी दावा क्रमांक ७७०/२०२५**

**जुना क्र. १४०१/२०१९**

बळीराम वि. महादेव

निशाणी क्रमांक ५९ खाली

**वादी तर्फे साक्षीदार क्रमांक १ रामचंद्र बळीराम बोंबलट यांचा शपथेवर पुढील सरतपास विधीज्ञ श्री. आय. डी. शेख यांच्यामार्फत**

१. माझ्या पुराव्याच्या शपथपत्रातील संपुर्ण मजकुर खरा व बरोबर असून त्यावर माझी सही आहे. पुराव्याकामी मी माझे वडील वादी क्र. १ बळीराम कोडींबा बोंबलट यांनी दि. २०.०३.२०२६ रोजी प्रस्तूत प्रकरणामध्ये त्यांच्या वतीने प्रकरण चालविण्याकरिता, साक्ष नोंदविण्याकरिता व इत्यादी न्यायालयीन कामकाजाकरिता माझ्या हक्कात नोंदणीकृत मूखत्यारपत्र लिहून दिले असून त्या मूखत्यापत्राची मूळ प्रत दाखल केली आहेत. सदर मूखत्यारपत्र **निशाणी क्र. ६१** वर आहे. तसेच मिळकत क्र. ४९ व २२६ या मिळकतीचे नमुना ८/अ चे उतारे दाखल केले असून ते अनुक्रमे **निशाणी ६२ व ६३** वर आहेत. फेरफार क्र. २१२ च्या उता-याची प्रमाणित प्रत दाखल केली असून ती **निशाणी क्र. ६४** वर आहे. तसेच दुय्यम निबंधक अधिकारी यांनी घर मिळकत क्र. ४९ व २२६ बाबत दिलेले मूल्यांकनचे प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत दाखल केली असून ती **निशाणी ६५** वर आहे.

**प्रतिवादी १ ते ७ तर्फे उलटतपास विधीज्ञ. श्री. ए. पी. करळे यांच्याकडून**

२. प्रस्तूतचा दावा गट क्र. २०५, २०६, २०७, ३१० व २९४ या जमीनीबाबत तसेच घर मिळकत क्र. ४९ व २२५ संदर्भात दाखल करण्यात आला आहे. माझे राहते घर गट क्र. ३१० मध्ये आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. ३१० मध्ये आम्ही वादींनी साधारणतः २० ते २५ लाख रुपये खर्च करुन स्वतंत्र बंगला बांधलेला आहे. सध्या गट क्र. ३१० मधील जमीन पडीक आहे. गट क्र. ३१० मध्ये आमची स्वतःची द्राक्षाची बाग होती आणि ती सध्या पडीक आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र. ३१० मधील जमीन आमचे व प्रतिवादी क्र. १४ लक्ष्मण यांच्या भांडणामुळे पडीक आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. १ याने गट क्र. २०५ मध्ये बंगला बांधलेला आहे. साक्षीदार स्वतः सांगतो की, प्रतिवादी क्र. १ याने बंगला आमच्या क्षेत्रात बांधलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र. २०५ मध्ये प्रतिवादी क्र. १ याने ४ एकरात द्राक्षाची बाग लावली आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. २०५ मधील द्राक्षाची बाग पडीक नाही. गट नं. २०५ मध्ये प्रतिवादी क्र. १ याने जरसी गायी व इतर जनावरे बांधण्याकरिता पत्र्याचे

शेड मारलेले आहे, याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. २०५ मध्ये नदीवरुन पाईपलाईन करण्यात आली आहे. साक्षीदार स्वतः सांगतो की, मी व प्रतिवादी क्र. १ यांनी मिळून पाईपलाईन केली आहे. प्रतिवादी क्र. १४ लक्ष्मण व माझ्यामध्ये वाटणी झाली नाही म्हणून गट नं. ३१० मधील द्राक्षाची बाग पडीक राहिलेली आहे.

३. हे म्हणणे खरे आहे की, मौजे शिराळा येथील गट क्र. २९५ मधील ६१ आर क्षेत्र वादी क्र. १ बळीराम, प्रतिवादी क्र. १ महादेव , प्रतिवादी क्र. ८ काशीबाई, प्रतिवादी क्र.९ ते १३ यांच्या नावे आहेत. गट नं. ३१० मध्ये आम्ही व प्रतिवादींनी सामायिकरित्या पाईपलाईन केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादी क्र. १, प्रतिवादी क्र. १ व ८ यांच्यामध्ये सन १९९९ साली वडिलोपार्जित मिळकतीचे तोंडी वाटप झाले आहे. हे म्हणणे खरे नाही की, वर नमूद वाटपामध्ये प्रतिवादी क्र. ८ ने तिचा मिळकतीतील हक्क सोडून दिलेला होता. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र. २०५ मधील ९ एकर २० गुंठे जमीन, गट क्र. २०७ मधील ४ एकर ३० गुंठे जमीन, गट क्र. २९४ मधील २४ आर तसेच ग्रामपंचायत मिळकत क्र. ४९ प्रतिवादी क्र. १ च्या हिश्श्यात वाटून आले आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. १ हा वरीलप्रमाणे त्याच्या हिश्श्यात वाटून आलेल्या जमीनीवर व घर मिळकतीवर काबीज आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र. ३१० मधील २ हे. ९८ आर जमीन, गट क्र. २०६ मधील ४ एकर जमीन, गट क्र. २९४ मधील २४ आर या जमीनी वर नमूद वाटपात वादी क्र. १ च्या हिश्श्यात वाटून आल्या आहेत.

४. हे म्हणणे खरे नाही की, वाद जमीनीचे अद्याप वाटप झालेले नाही आणि सर्व जमीनी वादी व प्रतिवादी यांच्यात संयुक्त कब्जेवहिवाटीत आहेत, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, वाद जमीनीच्या उता-यावर झालेल्या नोंदी कौटुंबिक व्यवस्था म्हणून करण्यात आली आहे, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मिळकत क्र. ४९ व २२६ आजदेखील वादी क्र. १ च्या नावे आहेत, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादी व प्रतिवादी यांचे एकत्र कुटुंब आहे, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट नं. ३१० मधील आमच्या हिश्श्यात आलेल्या जमीनी आम्ही स्वतंत्र खर्च करुन पाईपलाईन केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र. २०५ मध्ये प्रतिवादी क्र. १ याने स्वखर्चाने पाईपलाईन केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादी व प्रतिवादीमध्ये वाटप झाले असल्याकारणाने गट क्र. ३१० मध्ये आम्ही खर्च करुन बंगला बांधला आहे. हे म्हणणे खरे नाही की, सन १९९९ साली वाटप झाले असल्याकारणाने गट क्र. २०५ मध्ये प्रतिवादी क्र. १ याने स्वतः खर्च करुन द्राक्षाची बाग लावली आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये वाटप झाले नाही, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीने स्वतःच्या हिश्श्यात आलेली जमीनीची सुधारणा

केल्यामुळे आम्हा वादीच्या मनात द्वेष भावना निर्माण झाली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे व माझा भाउ लक्ष्मण यांच्यामध्ये वडिलाच्या हिश्श्यात आलेल्या जमीनीबाबत वाद असल्याकारणाने गट नं. ३१० व २०६ मधील जमीनी पडीक पडलेल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी हे त्यांच्या ताब्यातील जमीनी स्वतः मशागत करीत आहेत. हे म्हणणे खरे नाही की, सन १९९९ साली झालेल्या वाटपाची नोंद वादी क्र. १ व प्रतिवादी क्र. १ यांनी अज्ञानामुळे महसूल दप्तरी केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींना त्रास देण्यासाठी आम्ही खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा दाखल करण्यास कोणतेही कारण घडलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष नोंदवित आहे.

**प्रतिवादी क्रमांक ८ ते १४ व त्यांच्या विधिज्ञांचा पुकारा केला असता ते गैरहजर. सबब त्यांच्या वतीने साक्षीदाराचा उलटतपास नाही.**

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

ABDUL KARIM ABDUL RAHIMAN SHAIKH

Digitally signed by ABDUL KARIM ABDUL RAHIMAN SHAIKH
Date: 2026.07.07 16:08:30 +0530

दिनांकः–०७.०७.२०२६

**अ. अ. शेख**

दिवाणी न्यायाधीश व. स्तर, परंडा

RCS No. 770-2025

CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F file Judgment/Order/Record and Document are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | - | G. I. Khobre<br>Stenographer (Grade-III) |
| Court | - | Civil Court Senior Division, Paranda. |
| Date | - | 07-07-2026 |
| Order signed by the presiding officer on | - | 07-07-2026 |
| Order uploaded on | - | 07-07-2026 |